वाचा - १) महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम १९६७ व महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) (सुधारणा) नियम २००३

**२) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय मुंबई-३२ कडील**

१) शासन अधिसुचना दिनांक १९ मार्च २००३.

२) शासन निर्णय क्र.पदआ-२००७/प्र.क्र.११७/सेवा-१, दि.६ ऑगस्ट २००७

**३) महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग,मंत्रालय मुंबई-३२ कडील**

अ) शासन परिपत्रक क्र.जिपब-०७११/प्र.क्र.११३/११/आस्था-१४, दि.२९ सप्टेंबर २०११

ब) शासन परिपत्रक क्र.एपिटी-२००९/प्र.क्र.३५२/११/आस्थापना-८, दि.१७ डिसेंबर २००९

क) शासन परिपत्रक क्र.एपिटी-२०११/प्र.क्र.१९१/११/आस्थापना-८, दि.२९ डिसेंबर २०११

ड) शासन परिपत्रक क्र.संकिर्ण-२०१८/प्र.क्र.१७३/आस्थापना-८, दि.२८ सप्टेंबर २०१८

) शासन परीपत्रक क्रं संकिर्ण-२०१८/प्र क्रं १७३/ आस्था-८ दि ४ जाने २०२०

) शासन परीपत्रक कं संकिर्ण-२०१८/प्र क्रं १७३/आस्था-८ दि ५ फेबवारी २०२०

**४) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय मुंबई-३२ कडील**

अ) शासन निर्णय क्र.आयपीए/आरटीए/१०७९/४८३/१६-अ, दि.१० ऑक्टोंबर १९८०

ब) शासन निर्णय क्र आरटीए/१०७९/४८२/१६-अ, दि.१६/४/१९८१

क) शासन निर्णय क्र. अकंपा/१०९३/२३३५/प्रक्र/९०/९३/आठ दि.२६/१०/९४

ड) शासन निर्णय क्र.अकंपा-१००४/प्र.क्र.५१/२००४/आठ दि.२२ ऑगस्ट २००५

इ) शासन निर्णय क्र पअंक/१०९७/१७९३/प्र.क्र.-४/९८/१६-अ, दि.१९/३/१९९८

ई) शासन निर्णय क्र एसआरव्ही-१०९७/प्र.क्र.३१/९८/१६-अ, दि. १६ मार्च १९९९

इ) शासन निर्णय क्र.प्रशिक्षण/२०००/प्र.क्र.६१/२००१/३९ दि.१९/३/२००३

फ) शासन निर्णय क्र.पअंक/१००५/प्र.क्र.३६/०५/१६-अ दि.२६/८/२००५

ग) शासन परिपत्रक क्र.न्यायप्र-१००३/९९प्र.क्र.२/०३(भाग-२)१६-अ दि..२५/१०/२००५

घ) शासन निर्णय क्र.पअंक-१००९/प्र.क्र.२००/२००९/१६-अ,दि.२७ ऑक्टोंबर २००९

च) शासन निर्णय क्र.बीसीसी-२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब,दि.१२ डिसेंबर २०११

छ) शासन निर्णय क्र. अकपा-१०००/प्र.क्र.५९/ २०००, दि.२४/९/२००१

ज) शासन निर्णय क्र. अकपा-१०००/प्र.क्र.५९/२०००, दि.२१/११/२००२

झ) शासन निर्णय क्र.अकंपा/१०१३/प्र.क्र.८/आठ दि.२६/०२/२०१३.

छ) शासन निर्णय क्र.अकंपा-१०१४//प्र.क्र.१६४/आठ दि.२०/०५/२०१४

) शासन निर्णय क्रं अकंपा-२०१४/प्र क्रं १५५/आठ दि १७/११/२०१६

) शासन निर्णय क्रं अकंपा-१२१७/प्र क्रं १०२/आठ दि २१ सप्टेंबर २०१७

) शासन निर्णय क्रं अकंपा-१२१८/प्र क्रं ०१/आठ दि १५ फेबुवारी २०१८

) शासन निर्णय क्र संकिर्ण/१११८/प्र क्रं ३९/१६ अ दि १९ डिसेंबर २०१८

) शासन निर्णय क्रं बीसीसी २०१८/प्र क्र ५८१ए/२०१८ /१६ब दि १९ डिसेंबर २०१८

) शासन निर्णय क्रं अकंपा-१२१९/प्र क्रं ५६/आठ दि १० जुन २०१९

) शासन निर्णय क्रं अकंपा-१२१९/प्र क्रं ५६/आठ दि ११ सप्टे-२०१९

) शासन निर्णय क्रं अकंपा-१२२१/प्र क्रं १८३/आठ दि २६ ऑगस्ट-२०२१

**५) महाराष्ट्र शासन वित्त विभाग, मंत्रालय मुंबई -३२ कडील**

अ) शासन निर्णय क्र.अंनियो-१००५/१२६/सेवा-४, दि.३१/१०/२००५

ब) शासन निर्णय क्र.पदनि-२०१०/प्र.क्र.८३/१० वित्तीय सुधारणा-१, दि.२९/११/२०१०

क) शासन निर्णय क्र.पदनि-२०१२/प्रक्र.१५/१२/वित्तीय सुधारणा-१ दि.२२/०३/२०१२

ड) शासन निर्णय क्रं.अर्थसं२०२०/प्र क्रं.६५/अर्थ-३ दि ४ मे २०२०

इ) शासन निर्णय क्रं.अर्थसं२०२०/प्र क्रं.६५/अर्थ-३ दि ३० जुलै २०२०

६) अनुकंपा प्रतिक्षा सुची प्रसिध्द डिसेंबर २०२० व जुन २०२१ नुसार

७) म.मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.जळगांव यांची मान्य टिपणी दि. १४/१२/२०२१

**नियुक्ती आदेश**

जा.क्र.साप्रवि/आस्था-११/आरआर/५३७ /२०२१
सामान्य प्रशासन विभाग, जि.प.जळगांव
दिनांक - १४/१२/२०२१

महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम १९६७ व उक्त शासन निर्णयामधील तरतुदीनुसार मला असलेल्या अधिकाराचा वापर करून मी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, जळगांव खालील नमुद केलेल्या उमेदवारांना अनुकंपा तत्वावर जिल्हा तांत्रिक सेवा वर्ग ३ श्रेणी ३ बहुउद्देशिय आरोग्य कर्मचारी **आरोग्य सेवक (पुरूष)** या पदावर समयवेतनश्रेणीतील **एस-८ २५५००-८११००** या वेतनश्रेणीत खालील नमूद केलेल्या अटी व शर्तीवर तात्पुरती नेमणुक करीत असून त्यांना त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या कार्यालयात रिक्त पदी पदस्थापना करीत आहेत. सदर नेमणुक ही पूर्णतः तात्पुरती व अस्थायी स्वरूपाची आहे.

| अ. नं | अनुकंपाधारक उमेदवारांचे नांव व पत्ता | जातीचा प्रवर्ग | निवडीचा प्रवर्ग | पदस्थापीत केलेले कार्यालय | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | उपकेंद्र | प्राथमिक आरोग्य केंद्र | तालुका व जिल्हा |
| १ | श्री अनिल रामलाल सोनवणे रा.वाकडी, मु.पो.ता.जामनेर, जि.जळगांव | अनु.जमाती | अनु.जमाती | शहापुर | वाकडी | जामनेर |
| २ | श्री नितीन सुरेश सोनवणे,व्दारा- श्री दिलीप नवल थोरे, मयुर ग,हनिर्माण सोसायटी, प्लॉट नं. ७/२, खोटेनगर स्टॉप पुढे, मु.जळगांव, पो.पिंप्राळा, ता.जि.जळगांव. | अनु. जमाती | अनु. जमाती | पाळधी खु | चांदसर | धरणगांव |
| ३ | श्री अनिल हिरामण महाजन, रा.किनगांव, ता.यावल, जि.जळगांव | इमाव | इमाव | दहिगांव | कासोदा | एरंडोल |
| ४ | श्री नितीन शांताराम खैरनार, रा.निमखेडी, पो.पिंप्राळा, ता.जि.जळगांव. | इमाव | इमाव | आडगांव | कासोदा | एरंडोल |
| ५ | पंकज रमेश अहिरे, घाटरोड, चाळीसगांव, सदानंद हॉटेल समोर ता.चाळीसगांव,जि.जळगांव | अनु.जाती | अनु.जाती | आडगांव | उंबरखेड | चाळीसगांव |
| ६ | श्री अमर अशोक सोनवणे, प्लॉट नं.५३/५४, शिव कॉलनी, रेल्वे फाटयाजवळ, जळगांव.ता जि जळगांव | विमाप्र | विमाप्र | रत्नापिंप्री | शेळावे | पारोळा |
| ७ | श्री महेश निबा बिऱ्हाडे, मु.पो.सायगांव, ता.चाळीसगांव, जि.जळगांव | विमाप्र | विमाप्र | लोढे | लोढे | चाळीसगांव |

| अ. नं | अनुकंपाधारक उमेदवारांचे नांव व पत्ता | जातीचा प्रवर्ग | निवडीचा प्रवर्ग | पदस्थापीत केलेले कार्यालय | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | उपकेंद्र | प्राथमिक आरोग्य केंद्र | तालुका व जिल्हा |
| ८ | श्री जितेंद्र रामदास सोनवणे, मु.पो.इंदिरा नगर खिर्डी बु .ता.रावेर, जि.जळगांव | अनु जाती | अनु जाती | के-हाळे खु | वाघोड | रावेर |
| ९ | श्री योगेंद्र वसंत विसपुते, रामेश्वर कॉलनी, मेहरूण गट नं.२५०/३, प्लॉट नं.५०, देशदुतच्या पाठीमागे, एमआयडीसी, जळगांव | इ.मा.व. | इ.मा.व. | भातखंडे | पिंपरखेड | भडगांव |
| १० | श्री संदिप माधवराव सपकाळे मु.पो.रिंगणगांव, ता.एरंडोल, जि.जळगांव | अनु.जाती | अनु.जाती | देवगांव | तामसवाडी | पारोळा |
| ११ | श्री जितेंद्र हरी सपकाळे, रा.सावखेडा खुर्द, ता.जि.जळगांव | विमाप्र | विमाप्र | तोंडापुर | फत्तेपुर | जामनेर |
| १२ | श्री निशिकांत दिपक मोरे, प्लॉट नं.२२ ते ३३/७ ब्लॉक नं.३, गट | अनु.जमाती | अनु.जमाती | जामठी | येवती | बोदवड |
| १३ | श्री.रोहीत दिलीप श्रीखंडे ११/३ ए, प्लॉट नं.२, दांडेकर नगर,प्रिपाळा जळगांव | इमाव | इमाव | मोयगांव | वाकोद | जामनेर |
| १४ | श्री दिपक मुरलीधर चौधरी, रा.माळी वाडा, शिवाजी चौक, रावेर ता.रावेर जि.जळगांव | इमाव | इमाव | कोचुर | खिरोदा | रावेर |
| १५ | श्री प्रविण संतोष गंगावणे चुंगडे सर (राजपुत),द्वारा कि सन हरीभाऊ चौघरी राधाई लेआउट आयु डी पी कॉलनी छाबडा निवास समार वाशिम ता जि वाशिम | भज-(ड) | भज-(ड) | हरणखेडा | येवती | बोदवड |
| १६ | श्री राहूल राजाराम चव्हाण मु पो गोंहील नगर शिरुड नाका पुढे अमळनेर ता.अमळनेर जि.जळगांव | अनु.जमाती | अनु.जमाती | भरवस | मांडळ | अमळनेर |
| १७ | श्री धिरज अशोक चौधरी व्दारा- श्री अशोक जगन्नाथ चौधरी, मु.बोहर्डी खुर्द .काहूरखेडा ता.भुसावळ जि.जळगांव | इमाव | इमाव | अभोडा | लोहारा | रावेर |
| १८ | श्री.असलम समशेर तडवी रा.यावल साहिल नगर ता.यावल जि.जळगांव | अनु.जमाती (एस.टी) | अनु.जमाती (एस.टी) | कोळवद | सावखेडा सिम | यावल |
| १९ | श्री.पराग संजीव शिरसाठ, मु.पो.मांडळ ता.अमळनेर जि.जळगांव | विमाप्र (एसबीसी) | विमाप्र (एसबीसी) | मालदा भाडी | बेटावद | जामनेर |

## सदर नेमणुक ही खालील अटीवर व शर्तीवर करण्यात येत आहे.

१) सदर नेमणुक ही पुर्णतः तात्पुरती व अस्थायी स्वरूपाची असून सदर उमेदवारास नोटीसीशिवाय केव्हाही कारण न दाखविता कमी करण्यात येईल अशी आहे.

२) सदर पदासाठी वेतनासाठी होणारा खर्च हा शासकीय मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा. नेमणुकीच्या ठिकाणी हजर होण्याकरीता कोणत्याही प्रकारचा प्रवास भत्ता दिला जाणार नाही.

३) सदर उमेदवारांना अनुकंपा तत्वावर देण्यात आलेली नेमणुक नाकारता येणार नाही. सदरची नेमणुक नाकारल्यास अनुकंपा तत्वावरील नेमणुक रद्द करण्यात येईल, त्यानंतर अनुकंपा तत्वावर नेमणुक देण्यात येणार नाही. सदर उमेदवारांनी सदर आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत नियुक्तीचे कार्यालयात हजर होणे आवश्यक आहे. जर ते सदर मुदतीत हजर झाले नाहीत तर त्यांची नेमणुक रद्द म्हणून समजण्यात येईल.

४) सदर उमेदवारास सदर पदाचा राजीनामा द्यावयाचा असेल तर त्यांनी नियुक्ती प्राधिकरणाकडेस एक महिन्याची आगावू नोटीस द्यावी अथवा एक महिन्याचा पगार नोटीसी ऐवजी जिल्हा परिषद, जळगांव चे जिल्हा निधीत त्यांना जमा करावा लागेल.

५) **सदर उमेदवारांची नेमणुक पूर्व चारित्र्य व वर्तणुक बाबत सक्षम प्राधिका-याकडील पडताळणीच्या अधिन राहून नियुक्ती करण्यात येत आहे. अशा पडताळणी / चौकशी अंती काही आक्षेपार्ह बाबी आढळून आल्यास सदर उमेदवारास शासन तरतुदीनुसार जिल्हा परिषदेतील सेवा रध्द करण्यात येईल. सदर पडताळणीसाठी आवश्यक असलेले विहीत नमुन्यातील सांक्षांकन नमुना संबंधीत कार्यालयाने उमेदवारांकडून प्राप्त करून घेवून सदर आदेशाचे दिनांकापासून दहा दिवसाचे आंत या कार्यालयाकडेस तीन प्रतीत सादर करणे आवश्यक आहे.**

६) **सदर उमेदवारांनी नियुक्तीचे कार्यालयास हजर होण्यापूर्वी म. जिल्हा शल्य चिकित्सक जळगांव यांचेकडून वैद्यकीय तपासणी करून घेवून या जिल्हा परिषदेमध्ये सदर पदावर सेवेसाठी शारिरिक दृष्ट्या पात्र असले बाबतचा वैद्यकीय दाखला सादर करणे आवश्यक आहे. सदर उमेदवाराने या बाबत म. जिल्हा शल्य चिकित्सक यांचेकडेस सादर करावयाचे पत्र त्याचे सदरचे नियुक्तीचे कार्यालय प्रमुखाकडून प्राप्त करावयाचे आहे.**

७) **शासन निर्णय दि.१२/१२/२०११ नुसार मागासवर्गीय उमेदवाराच्या बाबतीत,** उमेदवाराने नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर सहा महिन्याच्या आत आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता संबंधित जात पडताळणी समितीकडून प्राप्त करून घेणे आवश्यक राहील. उमेदवाराने नियुक्ती स्विकारताच जात वैधता तपासणी करण्यासाठी प्रस्ताव कार्यालय प्रमुख/विभागप्रमुखामार्फत संबंधित जात पडताळणी समितीकडे सादर करावा व जात पडताळणी समितीने दिलेल्या पोचपावतीची साक्षांकित प्रत नियुक्ती प्राधिकाऱ्यास सादर करावी. मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार संबंधित जात पडताळणी समितीने उमेदवारांचे जात पडताळणीचे प्रस्ताव सहा महिन्याच्या आत निकाली काढावेत. जात पडताळणी समितीने त्याचे जात प्रमाणपत्र अवैध ठरविले तर दिलेले नियुक्ती आदेश त्वरीत रद्द करून अनुसुचित जाती, अनु.जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम २००० मधील तरतुदीनुसार त्वरीत कारवाई करण्यात येईल.

याप्रमाणे मुदतीत वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास सदर उमेदवाराची नेमणूक रद्द होवून त्यांच्या सेवा संपुष्टात आणल्या जावू शकतील. या बाबतचे हमीपत्र रू.१००/- चे प्रतिज्ञापत्रावर हजर होतेवेळी संबंधित उमेदवाराने कार्यालयास भरून दयावयाचे आहे.

८) सदर नियुक्तीचे कार्यालयात हजर होण्यापूर्वी सदर उमेदवारांनी यापूर्वी नोकरी (खाजगी संस्थेमध्ये किंवा खाजगी ठिकाणी)करीत असलेल्या सर्व पदांचा राजीनामा देणे आवश्यक आहे.